## टी. व्ही. वरील सर्व मालिका कुटुंबाला गृहीत धरूनच असणे आवश्यक – बी. पी. सिंग

पुणे, दि. १० जानेवारी २०२० : "आजही प्रत्येक घरात एक दिवाणखाना असतो आणि तिथे कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र बसून टी. व्ही. बघतात. त्यामुळे टी. व्ही. वरील सर्व मालिका कुटुंबाला डोळ्यासमोर ठेऊन घरातील लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्व बघू शकतील अशा पद्धतीने बनणे आवश्यक आहे. अगदी गुन्हे विषयक, रहस्य कथांवर आधारित मालिकाही अशाच पद्धतीने लिहिणे आवश्यक असून त्यादृष्टीने लेखक, दिग्दर्शकांनी विचार करणे व काळानुसार बदलण्यास तयार असायला हवे." असे मत प्रसिध्द मालिका सी. आय. डी. चे दिग्दर्शक बी. पी. सिंग यांनी व्यक्त केले.

'पुणे फिल्म फाउंडेशन' आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या '१८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' अर्थात 'पिफ' मधील 'पिफ डिस्टिंग्विश्ड ॲवॉर्ड' ने दिग्दर्शक बी. पी. सिंग यांना सन्मानित करण्यात आले होते. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत सिंग बोलत होते. यावेळी सी. आय. डी. मालिकेतील अभिनेत शिवाजी साटम, आदित्य श्रीवास्तव, दयानंद शेट्टी व 'पुणे फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष व 'पिफ' चे संचालक डॉ. जब्बार पटेल यावेळी उपस्थित होते.

सिंग म्हणाले, "आहट, सीआयडी सारख्या मालिका सुरुवातीला फक्त प्रौढांना नजरेसमोर ठेऊन बनविण्यात आल्या होत्या. मात्र नंतर या मालिका लहान मुलेदेखील बघू लागले. त्यामुळे आम्हाला त्यानुसार मालिकांमध्ये बरेच बदल करावे लागले. कुटुंबासाठी मालिका बनवताना काळजी घ्यावी लागते. जसा काळ बदलतो त्यानुसार कथा सांगण्याची पद्धतही बदलणे आवश्यक असते. हल्ली वास्तव व करमणूक असा एकत्रित आकृतिबंध टीव्हीवर अधिक पसंत केला जात आहे."

आपल्या कारकीर्दीचा प्रवास उलगडताना सिंग म्हणाले, "मी एफटीआयआयमध्ये कॅमेऱ्याचे शिक्षण घेतले आहे. त्यामुळे जेंव्हाही एफटीआयआयचा विषय निघतो तेंव्हा जुन्या आठवणी डोळ्यांसमोर तरळू लागतात. येथे देशभरातील विविध प्रांतातून विद्यार्थी येत असे. ते आर्थिकदृष्ट्या गरीब होते. त्यांची भाषा, जीवनपद्धती सगळेच वेगळे असे. येथे मी खरे जग काय आहे ते शिकलो. एफटीआयआयने जसे चित्रपट बघायला शिकविले त्यातून व्यक्तिमत्व घडत गेले. तंत्रज्ञला जात, धर्म नसतो. कॅमेरा माझ्या आयुष्याचा भाग झाला. संस्थेतील शिक्षणापलीकडे नोकरीला लागल्यावर अजून नवे बरेच काही शिकायला मिळाले. देशभर फिरून जेंव्हा बातम्या कव्हर केल्या तेंव्हा सत्य काय, दिखावा काय हे समजले आणि खरा भारतीय झालो."

साटम म्हणाले, “अभिनय हे साधन आहे. रंगमंच, टीव्ही व चित्रपट ही माध्यमे आहेत. प्रत्येकाची पद्धत वेगळी असल्याने थोडा फरक पडतो. मात्र चांगले कलाकार, दिग्दर्शक सोबत असले की आपोआप गोष्टी जमायला लागतात. चांगल्या लोकांचे काम बघूनच मी घडत गेलो. ”

आदित्य म्हणाले, “मी नाटकाच्या पार्श्वभूमीचा असल्याने रंगभूमीच माझे सरस्व होते. परंतु ‘बँडेड क्वीन’ चित्रपटात योगायोगाने संधी मिळाली व तेथून चित्रपटांचा प्रवास सुरु झाला. त्यानंतर सीआयडी मालिकेसाठी मी फारसा तयार नव्हतो. परंतु ते काम सुरु झाले व तो प्रवास एवढा मोठा होईल असे वाटलेच नव्हते. मी कलाकार म्हणून काम करत राहिलो. माझे गुरु हबीब तन्वीर म्हणत कलाकाराने प्रवास करत राहावे मुक्काम शोधू नये. तसा माझा प्रवास सुरु आहे. ”

दयानंद म्हणाले, “सीआयडी मालिकेचा आमच्यावर मालिका बंद झाल्यावरही प्रभाव आहे. मला अभिनयाच्या औपचारिक प्रशिक्षणाची पार्श्वभूमी नसतानाही सिंग सरांनी माझ्याकडून काम करवून घेतले. ते फार दूरचा आणि चौकटीबाहेरचा विचार करतात. त्यांच्या कामाच्या बाबत ते फार काटेकोर असल्यानेच सीआयडी मालिका २२ वर्षे चालू शकली. ”

For any media related queries, please contact - Hundred Percent Public Relations
Sneha - 9552583473 / Sampada - 9405035376 / Dhanshree- 9850890600

Hundred Percent Public Relations
PIFF Media Team